**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** सासवड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0109 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**20/03/2026 17:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिंनाक पासून):** 29/12/2025
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 29/12/2025
**Time From (वेळेपासून):** 14:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 20/03/2026 **Time (वेळ):** 15:53 बजे
(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 026
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 20/03/2026 15:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय, सासवड -

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शैलजा शशिकात शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड **,**मतदाता कार्ड **,**पासपोर्ट**,** यूआईडी सं.**,** ड्राइविंग लाइसेंस**,** पॅन कार्ड **)**

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7722011255

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (**माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल सुनिल सुतार | | | 1. सासवड ता पुरंदर जि पुणे , सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत<br>2. राजाळे ता फलटण जि सातारा , सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (**तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे**):**

9. **Particulars of properties of interest (**संबंधीत मालमत्तेचा तपशील**):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सासवड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं 109/2026 भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम 1988 चे कलम 7
फिर्यादी -मी शैलजा शशिकात शिंदे, वय-36 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे मो नं 7722011255.
आरोपी - श्री अमोल सुनिल सुतार, वय 31 वर्षे, मंडळ कृषी अधिकारी ( सासवड), वर्ग-2, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पुरंदर जिल्हा पुणे
गु घ ता वेळ - दिंनाक 29/12/2025 रोजी 14:55 ते 15:52 वा चे दरम्यान
ठिकाण - पंचायत समिती कार्यालय, सासवड - पुरंदर जिल्हा पुणे
दिंनाक 21/01/2026 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेविका भुजबळ यांना लोकसेवक सुतार यांनी केलेल्या 3000/- रुपये लाच मागणीबाबत काहीही माहिती नसल्याचे निष्पन्न झाल्याने तसेच तक्रारदार यांना दिंनाक 25/02/2026 पर्यत ट्रॅक्टर अनुदान प्राप्त न झाल्याने दिंनाक 25/02/2026 रोजी तक्रारदार यांनी लोकसेवक सुतार हे स्वत: लाच रक्कम स्विकारतील असे सांगितल्याने तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे दिंनाक 26/02/2026 रोजी नियोजीत सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे दिंनाक 26/02/2026 रोजी सापळा कारवाई करण्याकरीता आम्ही सापळा पथक व पंच यांचेसह सासवड जेजुरी बायपास येथील आंबोडी ब्रा ा ीज येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार श्री दिलीप वाडकर हे तेथे हजर होते. त्यावेळी सापळा कारवाईची उजळणी करुन पुढील सापळा कारवाई करण्याकरीता शासकीय व्हाईस रेकॉर्डरसह 13/41 वाजता पंच क्र.1 श्री खवले यांचेसह लोकसेवक श्री सुतार व लोकसेविका भुजबळ कृषी अधिकारी पंचायत समिती पुरंदर - सासवड यांचेकडे श्री सुतार यांनी पडताळणी कारवाईवेळी मागणी केल्याप्रमाणे लाच रक्कम 3000/- रुपये देऊन लोकसेवक श्री सुतार व लोकसेविका श्रीमती भुजबळ यांचे कार्यालय पंचायत समिती सासवड पुरंदर येथील कृषी अधिकारी कार्यालय येथे पाठविण्यात आले. त्यावेळी लोकसेविका श्रीमती भुजबळ हया कार्यालयात हजर नव्हत्या परंतु लोकसेवक श्री सुतार हे कार्यालयात हजर होते त्यावेळी लोकसेवक श्री सुतार व तक्रारदार श्री वाडकर यांचेमध्ये बोलणे झाले. तेव्हा तक्रारदार श्री वाडकर यांचेकडे लोकसेवक श्री सुतार कोणत्याही प्रकारे लाचेची मागणी अथवा स्विकार केला नाही. तसेच तक्रारदार यांचे औजाराच काम हे त्याचवेळी पुढ पाठविले असल्याचे तक्रारदार यांना सांगितले. तसेच "मी मागच्या वेळी शेतकरी मासिकचे चारशे घ्या असे बोललो होते" असे तक्रारदार यं ाना म्हणाले असुन तक्रारदार यांचे काम पुढ पाठविलय असे सांगितले. तसेच तुमचा कायतरी गैरसमज झालाय असे तक्रारदार यांना म्हणाले. तसेच "मी चारशे रुपये मासिकाबाबत बोलत होतो ते पण कंम्पल्सरी नाही" असे सांगितले. तसेच त्याचवेळी पुढ पाठविलय तुमच "ते ते भुजबळ मॅडमच्या लॉगिनला होतं, त्या पुढं पाठवणारं तालुक्याच्या लॉगिनला, जर तालुक्याच्या लॉगिनला, "हअं तुमच ते पाठवलय पुढं, फोंडकरचं पण पाठवलयं मॅडमनं पुढं असे म्हणाले व लाच रक्कमेबाबत मागणी केली नाही. तसेच तक्रारदार श्री वाडकर यांना लोकसेवक श्री अमोल सुतार यांनी दिंनाक 29/12/2025 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान मागणी केलेली 3000/- रुपये लाच रक्कम देण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी मी मासिकाचे रक्कम चारशे रुपये देण्याबाबत बोललो होतो असे सांगितले. परंतु दिंनाक 29/12/2025 रोजीचे पडताळणी कारवाईवेळी मासिकाच्या रक्कमेबाबत लोकसेवक व तक्रारदार यांच्यामध्ये बोलणी झालेली नाही. लोकसेवक श्री अमोल सुतार कृषी अधिकारी यानं ी तक्रारदार श्री दिलीप वाडकर यांचे ट्रॅक्टर अनुदान मंजुरी प्रस्ताव पुढे पाठविण्याकरीता दिंनाक 29/12/2025 रोजीचे पडताळणी कारवाईवेळी वेळी तक्रारदार श्री वाडकर यं ाच्याकडे रुपये 3000/- लाचेची मागणी केली. परंतु दिंनाक 29/12/2025, दि.

05/01/2026, दि.13/01/2026, दि.19/01/2026, दि.21/01/2026 व 26/02/2026 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री सुतार यांना संशय आल्याने त्यांनी स्विकारली नाही.

तरी लोकसेवक श्री अमोल सुनिल सुतार, वय 31 वर्षे, मंडळ कृषी अधिकारी ( सासवड), वर्ग-2, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पुरंदर जिल्हा पुणे यांनी तक्रारदार श्री दिलीप गंगाराम वाडकर रा. मु. वारवडी, पो. गराडे, ता. पुरंदर जिल्हा पुणे यांचेकडे त्यांचे ट्रॅक्टर अनुदान मंजुरी प्रस्ताव पुढे पाठविण्याकरीता दिनाक 29/12/2025 रोजीचे पडताळणी पंचनामा कारवाई दरम्यान पंचायत समिती कार्यालय, सासवड - पुरंदर जिल्हा पुणे येथे तक्रारदार श्री दिलीप वाडकर यांना पंचासमक्ष 3000/रू लाच रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणुन श्री अमोल सुतार, पद- कृषी अधिकारी, नेमणुक पंचायत समिती कार्यालय सासवड पुरंदर, यांनी सरकारी पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांचेकडे 3000/- रुपयांची लाच मागणी केली आहे. म्हणून माझी लोकसेवक श्री अमोल सुनिल सुतार , मंडळ कृषी अधिकारी ( सासवड), वर्ग-2, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पुरंदर जिल्हा पुणे याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.

दाखल अमंलदार - पो हवा/1936 होळकर

तपासी अमंलदार - म पो नि असावरी सो

फिंयाद तारीख 20/03/2026

मी शैलजा शशिंकात शिंदे, वय-36 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे मो नं 7722011255.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 29/12/2025 रोजी 10.30 वा मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तक्रारदार श्री दिलीप गंगाराम वाडकर, वय -58 वर्षे, धंदा शेती, रा. मु. वारवडी, पो. गराडे, ता. पुरंदर जि. पुणे मो नं-9763658505 यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. त्यानुसार आम्ही तक्रारदार यांना त्यांचे वर नमुद मोबाईलवर संपर्क करुन दिनाक 29/12/2025 रोजी 13.00 वा चे सुमारास आंबोडी येथील सासवड जेजुरी बायपास पुल येथे सुरक्षित ठिकाणी भेटुन पुढील कारवाई करावयाची असल्याचे सांगितले. त्यानंतर श्री. दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक,(प्रशासन) ला.प्र.वि पुणे यांनी तात्काळ आम्हाला सदर कारवाई करीता पुणे महानगरपालिका येथील पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिका येथील पंच साक्षीदार म्हणुन 1) श्री. विनोद रामदास खवले, वय 30 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद- लिपीक टंकलेखक, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग, पुणे मनपा, रा. मु.पो.शिंदेवाडी, ता.भोर जिल्हा पुणे मो न 8329811940 पंच 2) श्री जयराम तुळशीराम भुजबळ, वय 38वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- लिपीक टंकलेखक, पाणी पुरवठा विभाग,पुणे महानगरपालिका, रा.स.नं.39 शिंदे वस्ती, केशवनगर, मुंढवा, पुणे.36 मो न 9689932515 हे 11/00 वा. आमचे कक्षात समक्ष उपस्थित झाले. तसेच सदर कारवाई करीता आम्हास मदतनीस अंमलदार पोशि/1966 प्रविण तावरे, मपोशि/2652 कोमल शेटे आणि चालक पोशि 4337 चंद्रकांत कदम असे पथक उपलब्ध करुन दिले. सर्वाना योग्य त्या सुचना देऊन पंच साक्षीदार यांना माझी ओळख करुन दिली. त्यानंतर मी पडताळणी व सापळा कारवाई करीता लागणारे लॅपटॉप, पिं्रटर, काळा कपडा, अॅन्थ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायोलेट टॉर्च, मेमरी कार्ड, व्हाईस रेकॉर्डर, व्हिडिओ रेकॉर्डर, स्टेशनरी साहित्य व इतर साहित्य सोबत घेतले तसेच पंचांना तक्रारदार हे आंबोडी सासवड येथे भेटणार असल्याचे सांगुन पुढील कारवाई तक्रारदार यांना भेटुन करावयाची असल्याचे संागितले.

त्यानंतर आम्ही लाचलुचपत प्रतिंबधक विभाग कार्यालय येथुन 11:22 वा.चे सुमारास रवाना होवुन शिंदवणे मार्गे आंबोडी येथील सासवड जेजुरी बायपास पुलाचे जवळ 13:50 वा. चे सुमारास सुरक्षित ठीकाणी पोहचलो. सदर ठिकाणी तक्रारदार श्री दिलीप गंगाराम वाडकर, वय वर्षे, धंदा शेती, रा. मु. वारवडी, पो. गराडे, ता. पुरंदर जि. पुणे हे त्यंाच्या दुचाकी गाडी क्र. एम एच 12 एस.जे. 4436 सह हजर होते. त्यावेळी त्यांना सापळा पथकाची व पंचांची ओळख करुन दिली व ओळख करुन घेतली.

त्यानंतर तक्रारदार श्री. वाडकर यांनी लोकसेवक श्री अमोल सुतार, कृषी अधिकारी, पंचायत समिती पुरंदर-सासवड यांचेविरुद्ध असलेली लाचेच्या मागणीची तक्रार आमचे व पंचासमक्ष थोडक्यात कथन केली व त्याप्रमाणे तक्रारदार यांच्या विंनतीवरुन मी ती स्व:हस्ताक्षरात लिहली ती खालीलप्रमाणे

असे वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच पडताळणी निवेदन, सापळा निवेदन आणि सापळा कारवाई झाल्यावर लोकसेवक यांचेकडुन लाच रक्कम हस्तगत करतेवेळी सदर मोबाईलद्वारे चित्रीकरण करण्यात येणार असल्याचे तक्रारदार व पंच साक्षीदार यांना कळविले.
त्यानंतर आमचे व तक्रारदार श्री वाडकर तसेच पंच क्र.1 श्री खवले व पंच क्र 2 श्री भुजबळ यांचे पडताळणी निवेदन सापळा पथकाचे मदतीने हाताने लिहुन ते निवेदन 14:55 वा. ते 15/01 वाचे दरम्यान आमचेकडील शासकीय व्हाईस रेकॉर्डर मध्ये घेण्यात आले तसेच त्याचे व्हिडीओ रेकॉर्डीग करण्यात आले. तसे ते पंचनाम्यामध्ये सविस्तर नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर तक्रारदार पंच व सापळा पथकास पडताळणी कारवाईच्या सुचना दिल्या. त्यानंतर शासकीय व्हाईस रेकॉर्डींग डिव्हाईसची तक्रारदार व पंचांना माहिती देऊन पोशि तावरे यांनी माझे सुचनेनुसार व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला लावला. त्यानंतर तक्रारदार श्री. वाडकर व पंच क्र. 1 श्री. खवले यांना तक्रारदार यांच्या स्प्लेंडर गाडी क्र. एम एच 12 एस.जे.4436 वरुन लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता पंचायत समिती पुरंदर - सासवड येथे रवाना केले. ती वेळ 15:09 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक शासकीय वाहनामध्ये आंबोडी ब्राीज येथे थांबुन राहीलो.

त्यानंतर साधारणपणे 15:52 वाजण्याचे सुमारास तक्रारदार श्री. वाडकर व पंच क्र. 1 श्री. विनोद खवले हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी तक्रारदार यांचे दुचाकी स्प्लेंडर गाडी क्र. एम एच 12 एस.जे.4436 वरुन आले तेव्हा पोशि तावरे यांचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर तक्रारदार यांना रवाना केलेपासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी पंचासमक्ष सांगितले कि, "मी व पंच क्र.1 असे आम्ही लोकसेवक श्री अमोल सुतार मंडळ कृषी अधिकारी (सासवड) यांना भेटण्याकरीता, पंचायत समिती कार्यालय पुरंदर, सासवड येथील कृषी अधिकारी असा बोर्ड असलेल्या केबीनमध्ये गेलो. त्या ठिकाणी श्री सुतार साहेब उपस्थित होते, त्यावेळी मी व पंच सुतार साहेबंाना नमस्कार करुन कामाचे संदर्भात चर्चा केली. त्यावर श्री अमोल सुतार मला म्हणाले " घीतली का.. पावती तिकडची खालची.." त्यावर मी त्यांना "ते.. पावती आणाय गेलो नहाय.. मी.." असे म्हणालो, त्यानंतर कामासदंर्भात चर्चा होऊन श्री सुतार मला "ते जुन बिल पण घीवुन ठिवाव लागत.. बर का परत... तुमच बिल निघत ना ओरीजनल परत.... ं" असे म्हणाले, त्यावर मी "सव्वा लाखाच हाय ना वाडत.. ं" असे म्हणालो, त्यावर श्री सुतार मला म्हणाले की "कशाला .." , त्यावर मी श्री. सुतार यांना "ट्रॅक्टरला.." असे म्हणालो, त्यावर श्री सुतार मला "क्षेत्राव असत.. तुमाला संमती बघा ना किती आलीय.. दोन हेक्टरचे वर असेल तर हिकड तिकड होत "असे म्हणालेे. त्यावर मी श्री सुतार यांना "हे त्याज्यात ते त्या दिवशी म्हणला होता.. ते जरा काय तरी करा.." असे म्हणालो. त्यावर श्री सुतार "हा.. ते हे कराय लागल ना वरती .. नायतर त्रुटी काढत्यात.. त्रुटी काढत्यात परत ते.. " असे म्हणाले, त्यावर मी श्री सुतार यांना "अर. तुमच काय म्हणता ते बी कायच कळत नहाय.. काय तरी करा खाली वर मणजे काय.. ते" असे म्हणालो. तेव्हा श्री सुतार मला "तुमी सांगा आता.. आम्ही बोलतोय तस.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "मग काय इकड बोलाय ते.." असे म्हणालो. तेव्हा श्री सुतार मला "चला बाहेर.. बाहेर चला की." असे म्हणाले. तेव्हा श्री अमोल सुतार मला व पंच क्र.1 श्री विनोद खवले यांना तळमजल्यावरील दुय्यम निंबधक कार्यालया जवळील पार्कीगमध्ये घेऊन गेले तेव्हा पंच क्र.1 यांची श्री सुतार यांनी चौकशी केली व त्यांचे कामासंदर्भात विचारणा केली. त्यानंतर मी त्यांना "बोला की" असे म्हणालो. तेव्हा श्री सुतार मला "तुम्ही सांगा किती काय ते.. अहवाल पाठवाय लागतो साहेबंाना परत." असे म्हणाले. त्यावर मी श्री सुतार यांना " आओ आता काय तरी करा तुम्हीच आता कशाला." त्यावर श्री सुतार मला " साहेबंाना दयाव लागत.. तुमच सांगा किती हे ते.." असे म्हणाले. त्यावर मी श्री सुतार यांना "आओ पाच हजार साहेब जास्त होत्यात कुणाला बी दया त्याज काय.. पोर म्हणत्यात एवढ पैसे कस काय दयायच.." असे म्हणालो. त्यावर श्री सुतार मला "चार करा..चार करा.. असे म्हणाले. त्यावर मी श्री सुतार यांना " तिनमध्ये करा.. ते बी आता काढुन जावुन आणाव लागत्याल.. पैसे हेत का तेव्हढ.." असे म्हणालो. त्यावर श्री सुतार मला "करा आता तिन ..लय कमी होतय ओ.. ते वर दयाव लागत्याती दोन तिन जन असत्यात. असा असतो विषय तो.. करा तीन.." असे म्हणाले. त्यावर मी श्री सुतार यांना "म्हणन.. बरोबर हे.." असे म्हणालो. त्यावर श्री सुतार मला "पाच असत्यात पण आता जाऊदे ठिके तुमच्यासाठी.. तिन करु जाऊदया आता काय.. आणल्यात का आणायच्यात.." असे म्हणाले. तेव्हा मी श्री सुतार यांना "हितन काढुन आणतो ना हयाज्यातन.."असे म्हणालो. त्यावर श्री सुतार मला "चालतय..सांगु नका कुणाला.. कस ते आपल्याला कराव लागत लवकर.. त्याज्यासाठी असत .. परत ते त्रुटी काढत बसत्यात हे ते.." असे म्हणाले. त्यावर मी श्री सुतार याना "हा.. तिन मध्ये करुन टाका.."असे म्हणालो. त्यावर श्री सुतार मला "चालतय करा की आणा" असे म्हणाले. तेव्हा मी श्री सुतार यांना "येतो थोडया वेळात काढुन मग.." असे म्हणालो. त्यावेळी लाकसेवक सुतार हे मला येताना एकटेच या व पंचांना उद्येशुन त्यांना आणु

"मी वरील नमुद ठिकाणी माझे कुटंुबासह राहणेस आहे. माझी मौजे वारवडी येथे शेतजमिन असुन सदर शेतजमिनीतील कामाकरीता ट्रॅक्टर खरेदीकरीता शासनाच्या कृषी यांत्रीकीकरण योजने अंतर्गत अनुदान मिळणेबाबत शासनाच्या mahadbt.maharashtra.gov.in या पोर्टलवर दिंनाक 06/08/2024 रोजी अर्ज केला होता. त्याचा ऑनलाईन अर्ज क्र. 242510014835988 असा आहे. त्याप्रमाणे मी ट्रॅक्टर खरेदी करुन त्याची कागदपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे शासनाच्या महा-डीबाीटी योजनेअंतर्गत ऑनलाईन पद्धतीने सादर केली आहेत. सदर अर्ज केल्यानंतर लॉटरी पद्धतीने माझे अर्जाची अनुदान मिळणेकरीता निवड झाली आहे. सदर ट्रॅक्टर खरेदी अनुदान योजना ही पंचायत समिती पुरंदर जिल्हा पुणे यांचे कार्यालयाअंतर्गत असणा-या कृषी अधिकारी सासवड - पुरंदर यांच्याकडे आहे.

त्याअनुषंगाने ट्रॅक्टर खरेदीचे पडताळणीसाठी अमोल सुतार कृषी अधिकारी सासवड पंचायत समिती पंुरंदर जिल्हा पुणे हे दिंनाक 23/12/2025 रोजी दुपारी 03/00 वाजताचे सुमारास माझे वर नमुद राहते घरी आले. त्यावेळी त्यानंी ट्रॅक्टरचे व माझे फोटो काढले त्यानंतर मी केलेल्या ट्रॅक्टर खरेदी अनुदान मिळणेकरीता प्रस्ताव पुढे पाठविणेसाठी 5000/- रुपये दयावे लागतील असे सागितले. सदर प्रस्तावाकरीता कोणतीही शासकीय फी भरावी लागत नाही. सर्व प्रक्रीया ही ऑनलाईन पध्दतीने चालते याबाबत मला माहित आहे. तरीही माझा प्रस्ताव पुढे पाठविण्याकरीता मी नाईलाजास्तव 5000/- रुपये देण्याकरीता सुतार साहेबांना होकार दिला. त्यानंतर मी माझे अनुदान मंजुर होण्याची वाट पाहीली.

काल दिंनाक 28/12/2025 रोजी दुपारी 11:30 वाजताचे सुमारास श्री अमोल सुतार यांनी मला त्यांचे मोबाईल क्र 8459240659 वरुन माझे मोबाईल क्र 9763658505 यावर फोन करुन भेटुन गेल्याशिवाय प्रस्ताव पुढे पाठवणार नाही, असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना उदया सोमवारी येतो, असे सांगितले. त्यानंतर आज दिंनाक 29/12/2025 रोजी 1:30 वाचे सुमारास श्री अमोल सुतार यांनी वर नमुद मोबाईल क्रमांक यावरुन माझे नमुद मोबाईल क्रमांकावर फोन करुन भेटायला केव्हा येताय, असे विचारले असता मी त्याना थोडया वेळाने येतो असे सांगितले.

तरी लोकसेवक श्री अमोल सुतार, कृषी अधिकारी,सासवड, ता पुरंदर, जि पुणे यांनी मागणी केलेले रुपये 5000/- ही रक्कम कोणतीही शासकीय फी नसुन लाच रक्कम असल्याची माझी खात्री असुन मला ती लाच रक्कम देण्याची इच्छा नाही. तसेच माझे व कृषी अधिकारी अमोल सुतार यांचेत कोणतीही आर्थिक देवाणघेवाण तसेच उसणवारी नाही. तरी श्री. अमोल सुतार, कृषी अधिकारी, सासवड, ता पुरंदर, जि पुणे यांचेविरुद्ध आपले विंभागामाफत कायदेशीर कारवाई होणेस विनती आहे. मला वाचता येते परंतु व्यवस्थित लिहीता येत नसल्याने पो. नि.शैलजा शिंदे यांनी सापळा पथकासह सासवड येथे आल्यानंतर माझी तक्रार मी सांगितल्याप्रमाणे त्यांचे हस्ताक्षरात लिहीली असुन ती मी वाचुन पाहिली असता माझे सांगणेप्रमाणे ती बरोबर व खरी आहे."

वरिलप्रमाणे मी तक्रारदार यांच्या सांगण्यावरुन लिहलेली तक्रार तक्रारदार श्री वाडकर व दोन्ही शासकीय पंचांनी वाचुन पाहिली ती तक्रारदार यांचे सांगणेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री करुन त्यावर तक्रारदार व पंचांनी दिंनाका सहीत स्वाक्षरी केली. त्यानंतर सदर कारवाई दरम्यान पंच क्र.1 म्हणुन श्री. विनोद रामदास खवले हे काम करतील तसेच हे पंच क्र.2 म्हणुन श्री जयराम तुळशीराम भुजबळ हे काम करतील असे ठरविण्यात आले. सदर तक्रारीची पडताळण्ी करण्याकरीता तक्रारदार व पंच क्र.1 असे स्वत:च्या वर नमुद दुचाकी वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालय पंचायत समिती कार्यालय सासवड- पुरंदर येथे पाठवुन लोकसेवक श्री. अमोल सुतार यांची तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर आम्ही सदर कारवाईदरम्यान शासकीय व्हाईस रेकॉर्डर क्र.IC RECORDAR ICD -UX570F सिरीयल क्र.1027623 SONY CORP BM MADE IN CHINA हा वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्यामध्ये sandisk ultra 32 GB micro sd u1 hci c10 a1 5123DFDA714X BL MADE IN CHINA असे लिहलेले मेमरी कार्ड वापरण्यात येणार असल्याचे संागीतले. कारवाईदरम्यान शासकीय कॅमेरा उपलब्ध नसल्याने म पो शि/2652 शेटे यांचेकडील त्यांचा सॅमसंग कंपनीचे मोबईल फोन वापरण्यात येणार असुन त्यामध्ये sandisk ultra 32 GB sd u1 hci c10 a1 4086DRGJ144 BL MADE IN CHINA

नका असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांचेशी थोडा वेळ चर्चा करुन त्या ठिकाणाहुन निघुन पंच क्र.1 श्री खवले यांचेसोबत माझे दुचाकी गाडीतुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो आहोत. अशी माहिती तक्रारदार यांनी सांगितली.

त्यानंतर आम्ही पंच क्र.1 श्री. विनोद खवले यांना घडलेला घटनाक्रम विचारला असता, त्यांनी तक्रारदार यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण पंचासमक्ष आम्ही ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली. त्यंाचे झालेले संभाषण सविस्तर पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

झालेल्या पडताळणी करावाईवरुन लोकसेवक श्री अमोल सुनिल सुतार मंडळ कृषी अधिकारी ( सासवड) नेमणुक तालुका कृषी अधिकारी कार्यालय पुरंदर जिल्हा पुणे यांनी तक्रारदार श्री. दिलीप वाडकर यांना ट्रॅक्टरचे अनुदान मिळणेचा प्रस्ताव पुढे पाठविणेकरीता सुरुवातीस 5,000/- रुपयांची लाच मागणी करुन तडजोडी अंती 3,000/- रुपयाची मागणी करुन लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा पुर्व व सापळा कारवाईची तयारी करण्यात आली. त्यावेळी लोकसेवक श्री सुतार यांना पंच क्र. 1 यांचा संशय आल्याने ते लाच रक्कम नाकरण्याची शकयता असल्याने त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम रुपये 3000/- रुपये देण्याकरीता तक्रारदार श्री वाडकर यांचेसोबत पंच क्र.2 श्री भुजबळ यांना पाठविण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आमचे, तक्रारदार श्री वाडकर व पंच क्र.1 व 2 यांचे सापळापुर्व / सापळा निवेदन सापळा पथकाचे मदतीने हाताने लिहुन ते 16/53 वाजता ते 17/01 वा.पर्यत व्हाईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्याचवेळी म.पो.शि.2652 शेटे यांनी सापळा निवेदनाचे वेळेचे चित्रीकरण त्यांचेकडील मोबाईलचे सहाय्याने केले. ते सापळा पंचनाम्यामध्ये सविस्तर घेण्यात आले आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री वाडकर यांना लोकसेवक श्री सुतार मंडळ कृषी अधिकारी (सासवड) यांनी लाच मागणी केलेल्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार श्री. वाडकर यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले 500/- रूपये दराच्या 6 भारतीय चलनी नोटा असे एकुण 3,000/- रु. हजर केले. नोटांचे नंबर माझे सुचनेवरुन म.पो.शि. कोमल शेटे यांनी एका को¬-या कागदावर लिहुन घेतले त्यावर मी व पंचानी स्वाक्षरी केली. नोटांचे सविस्तर वर्णन पंचनाम्यामध्ये नमुद आहे.

त्यानंतर सापळा पथकाच्या मदतीने तक्रारदार व पंच साक्षीदार यांना करावयाच्या सापळा कारवाईची माहिती देऊन त्याबाबतचे चालक पो.शि.चंद्रकांत कदम यांचे मार्फतीने शासकीय वाहनामध्ये प्रात्यक्षित करुन दाखविण्यात आले. त्याबाबतचे वर्णन सविस्तर सापळा पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर चालक पो.शि.चंद्रकांत कदम यांनी आमचे सुचनेनुसार वर नमुद नोटांना अॅंथ्रासीन पावडर लावुन त्या नोटा तक्रारदार श्री दिलीप वाडकर यांचे शर्टच्या वरिल डाव्या बाजुचे खिशात ठेवल्या. त्यानंतर पो.शि.चंद्रकांत कदम यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार, पंचाना व सापळा पथकास सविस्तर सुचना देण्यात आल्या. तसेच तक्रारदार यांना लोकसेवक श्री सुतार यांनी लाच स्विकारल्या नंतर कार्यालयाचे बाहेर आवारात येवुन त्यांच्या डोळयावरील चष्मा काढण्याबाबत इशारा करण्याची सुचना दिली. सापळा पथकातील टीम मधिल सर्वाना काम समजावुन सुचना देण्यात आल्या. त्यांनतर शासकीय व्हाईस रेकॉर्डर सुरू करून ते पो.शि.तावरे यांचेकरवी ऐका सेफटी पिनच्या साहयाने तक्रारदार यांचे बनीयानचे आतुन लावुन दिला. तक्रारदार व पंच क्रमांक 02 श्री जयराम भुजबळ यांना लोकसेवक अमोल सुतार, मंडळ कृषी अधिकारी (सासवड) यांना भेटण्यासाठी पंचायत समिती कार्यालय सासवड- पुरंदर येथे जाण्याकरीता तक्रारदार यांचे मोटार सायकल क्रमांक एम एच 12 एस.जे. 4436 वरुन 17.08 वा रवाना केले. त्याचे मागुन मी व सापळा पथक, पंच क्रमांक एक श्री खवले यांचे सह सरकारी वाहनाने पंचायत समीती कार्यालय सासवड- पुरंदर येथिल परीसरात आलो व कार्यालय परिसरात सापळा लावुन थांबलो. थोडया वेळाने तक्रारदार दिलीप वाडकर व पंच क्र.2 श्री भुजबळ हे कृषी अधिकारी कार्यालयाच्या बाहेर आले त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक यांनी लाच स्विकारलेबाबत इशारा केला नाही. त्यामुळे आम्ही सर्व सापळा पथक पंचायत समिती कार्यालयाचे बाहेर थोडया दुर अंतरावर जेथे आमचे शासकीय वाहन होते तेथे आलो. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पो. शि.प्रविण तावरे यांनी तक्रारदार याचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला व ताब्यात घेतला ती वेळ 17:43 वा.

ची होती. त्यानंतर आम्ही सापळा पथक व पंच क्र.1 यांचेसह आंबोडी येथील सासवड जेजुरी बायपास पुलाचे जवळ येऊन थांबलो आमचे पाठोपाठ तक्रारदार व पंच क्र.2 हे सदर ठिकाणी आले.

त्यावेळी तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसण्यास सांगुन आम्ही तक्रारदार श्री वाडकर यांना रवाना केल्यापासून ते परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी पंच साक्षीदार यांचे समक्ष सांगितले की," मी व पंच क्र 2 असे माझ्या दुचाकी वाहन स्प्लेंडर क्र. एम.एच.12 एस.जे. 4436 वरुन लोकसेवक श्री अमोल सुतार यांचे पंचायत समिती सासवड - पुरंदर येथील कृषी अधिकारी कार्यालयात गेलो असता तेथे लोकसेवक श्री अमोल सुतार हे कार्यालयात हजर होते. त्यावेळी मी श्री सुतार यांनी "उशीर झाला" असे बोलले त्यावर मी त्यांना "खरेदी कराय.. औजारं, गेल होतो तिंकड.. वही आणली का. " असे म्हणालो. त्यावर ते मला " झाली का खरेदी करुन" असे म्हणाले. त्यावर मी श्री सुतार यांना "केली की.. ते पेरणी यंत्रण.." असे म्हणालो. त्यावर श्री सुतार मला "झाल काम इथल आपल.. " असे म्हणाले. त्यावर मी श्री सुतार यांना "मी तर म्हणल गेला का काय तुमी इथन.." असे म्हणालो. त्यावर श्री सुतार मला "औजाराची तपासणी करायच्या वेळेस भेटतो तुमाला घरी तिंकड.." असे म्हणाले. तेव्ही मी त्यांना "आता नगो का.. चालतय.." असे म्हणालो. त्यावर श्री सुतार मला "मी भेटतो तुमाला." असे म्हणाले. त्यावर मी श्री सुतार यांना "चालतय.. जाऊ का मग" असे म्हणुन तेथुन निघुन आलो माझे पाठोपाठ पंच क्र.2 हे सुध्दा कार्यालयातुन बाहेर आले." अशी हकिकत सांगितली. तसेस पंच क्र.2 यांनी सुध्दा तक्रारदार याचेच मेळाची हकिकत संगितली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण आम्ही पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 2 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली. तक्रारदार श्री वाडकर यांची लोकसेवक श्री अमोल सुतार यांचेशी भेट झाली. परंतु त्यावेळी लोकसेवक श्री अमोल सुतार, मंडळ कृषी अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कमेचा स्विकार केला नाही. तसेच तक्रारदार यांना "इथल काम झाल आपल.. तपासणी करायच्या वेळेस तुमाला भेटतो घरी तिकड" असे सांगितले. त्यामुळे तक्रारदार त्या ठिकाणाहुन लाच रक्कम न देता निघुन आले. त्यावेळी लोकसेवक श्री अमोल सुतार यांनी तक्रारदार श्री वाडकर यांना संागितल्याप्रमाणे ते तक्रारदार यांचेकडे तपासणी कामी येतील त्यावेळी पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले व त्यादिवशीची सापळा कारवाई सर्वानुमते स्थगित करण्यात आली. त्यानंतर आम्ही, संपुर्ण पथक व पंच शासकीय वाहनाने सदर ठिकाणाहुन 18.38 वाजता निघुन लाप्रवि, पुणे कार्यालात 20.15 वा चे सुमारास पोहोचलो. त्यानंतर झालेल्या कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

दिंनाक 04/01/2026 रोजी तक्रारदार यांनी आम्हाला फोन वरुन कळविले की, लोकसेवक सुतार हे घरी औजार तपासणी करीता आले नाहीत तसेच लोकसेवक सुतार हे त्यांच्या कार्यालयात असण्याची शक्यता असुन मागणी केलेली लाच रक्कम स्विकरण्याची शक्यता आहे. त्यामुळे तक्रारदार यांचे संागण्यावरुन दिनाक 05/01/2026 रोजी नियोजीत सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले, त्याप्रमाणे आम्ही व पंच साक्षीदार,सापळा पथक 10.13 वा.चे दरम्यान लाप्रवि कार्यालय पुणे येथुन शासकीय वाहन मारुती सुझुकी इरटीगा एम.एच.12 यु.सी. 4105 मधुन सापळा कारवाईचे साहीत्यासह रवाना होऊन त्याबाबत तक्रारदार यांना तसे अवगत करून आम्ही सापळा पथकासह आंबोडी येथील सासवड जेजुरी बायपास पुलाचे जवळ 11:55 वा. सुमारास पोहचलो त्यावेळी तक्रारदार हे सदर ठिकाणी त्यांचे स्प्लेंडर दुचाकी गाडी क्र. एम एच 12 एस.जे.4436 सह उपस्थित होते. त्यावेळी तक्रारदार श्री वाडकर यांना पंच क्र.2 श्री भुजबळ यांचेसोबत लोकसेवक श्री अमोल सुतार यांना लाच रक्कम देण्याकरिता पंचायत समिती कार्यालय पुरंदर - सासवड येथे पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करून आमचे व तक्रारदार श्री. वाडकर व पंच क्रमांक -1 श्री. विनोद खवले व पंच क्रमांक - 2 श्री. जयराम भुजबळ यांचे सापळा कारवाई निवेदन घेतले ती वेळ 12.31 ते 12/37 वा.चे दरम्यानची होती. त्यांनतर दिनाक 29/12/2025 रोजी तक्रारदार यांचेकडून प्राप्त केलेली लाच रक्कम पुन्हा हजर करून पंचासमक्ष तीच असलेची खात्री करून दिली व पो.शि.चंद्रकांत कदम यांना सुचना दिल्या त्यप्रमाणे त्यांनी सदर लाच रकमेच्या नोटांना अॅथ्रॅसीन पावडर लावुन गुणधर्मसांगुन पुन्हा प्रात्यक्षिक करून दाखविले. सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पथक तक्रारदार व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या.

सदर रक्कम पो.शि.चंद्रकांत कदम यांचेकरवी तक्रारदार श्री वाडकर यांचे शर्टच्या डाव्या बाजुचे खिशात ठेवली. त्यांनतर शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांचे शर्टाचे आतील बाजूस पो.शि.9843 महामुलकर यांचेकरवी लावला व तक्रारदार आणि पंच क्रमांक 2 श्री भुजबळ यांना तक्रारदार यांचे मोटारसायकल स्प्लेंडर दुचाकी गाडी क्र. एम एच 12 एस.जे.4436 वरून लोकसेवकाचे कार्यालयात लाच रक्कम देण्याकरिता रवाना झाले

तेव्हा 12:50 वाजले होते. त्याचे मागुन मी व सापळा पथक, पंच क्रमांक 1 श्री खवले यांचे सह सरकारी वाहनाने पंचायत समीती कार्यालय सासवड- पुरंदर येथिल परीसरात आलो व कार्यालय परिसरात सापळा लावुन थांबलो. थोडया वेळाने तक्रारदार दिलीप वाडकर व पंच क्र.2 श्री भुजबळ हे कृषी अधिकारी कार्यालयाच्या बाहेर आले त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक यांनी लाच स्विकारलेबाबत इशारा केला नाही. त्यामुळे आम्ही सर्व सापळा पथक पंचायत समिती कार्यालयाचे बाहेर थोडया दुर अंतरावर जेथे आमचे शासकीय वाहन होते तेथे आलो. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 14:55 वा. होती.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री वाडकर यांना रवाना केल्यापासून ते परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी दोन्ही पंचांसमक्ष सांगितले की, मी व पंच क्र 2 असे माझ्या दुचाकी वाहन स्प्लेंडर क्र. एम.एच.12 एस.जे. 4436 वरुन लोकसेवक श्री अमोल सुतार यांचे पंचायत समिती सासवड - पुरंदर येथील कृषी अधिकारी कार्यालयात गेलो तेथे लोकसेवक श्री अमोल सुतार हे त्यांचे केबीनमध्ये दिसुन आले नाहीत त्यामुळे मी कार्यालयातील इतर महिला कर्मचारी यांना लोकसेवक सुतार यांचेबाबत विचारणा करता त्यांनी, लोकसेवक श्री. सुतार साहेब मिटींगमध्ये असल्याचे सांगितले. काही वेळाने लोकसेवक श्री. सुतार हे कार्यालयामध्ये आले तेव्हा मी त्यांना "होतय का नाय" असे म्हणालो त्यावर ते मला "तुमचं झालं की, पाठवलं, तुमचं झालं त्याचवेळेस म्हणलं तसेच तुमचं झालं खोंडकरच पण झालं त्याचवेळेस" असे म्हणाले. त्यावर मी श्री सुतार यांना "खोंडकरचं काय.." असे म्हणालो. त्यावर श्री सुतार मला "खोंडकरच पण, मॅडमनी पाठवलं हिंकड" असे म्हणाले. फोनवर एका व्यक्तीला "जायचय ना आपल्याला, या तिंकड जावु आपण उशीर होतय मं, बरं बरं या तुम्ही तिकड" असे म्हणुन घाई घाईमध्ये त्या ठिकाणाहुन निघुन गेले. बराच वेळ वाट लोकसेवक सुतार हे कार्यालयामध्ये येण्याची शक्यता वाटत नसल्याने मी व पंच क्र.2 असे माझे दुचाकीने आपण थांबलो त्याठिकाणी परत आलो असे सांगितले. त्यामुळे जेवणाची वेळ संपल्यानंतर लोकसेवक कार्यालयामध्ये येण्याची वाट पाहुन त्याप्रमाणे पुन्हा पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांना लोकसेवक श्री सुतार यांची भेट घेण्याकरीता शासकीय व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंच नं. 2 श्री भुजबळ यांचेसोबत त्यंाचे दुचाकी हिरो होंडा स्प्लेंडर गाडी क्र. एम एच 12 एस.जे. 4436 वरुन रवाना केले ती वेळ 16:13 वा.ची होती. त्याचे मागुन मी व सापळा पथक, पंच क्रमांक 1 श्री खवले यांचे सह सरकारी वाहनाने पंचायत समीती कार्यालय सासवड- इंदापुर येथिल परीसरात आलो व कार्यालय परिसरात सापळा लावुन थांबलो. थोडया वेळाने तक्रारदार दिलीप वाडकर व पंच क्र.2 श्री भुजबळ हे कृषी अधिकारी कार्यालयाच्या बाहेर आले त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक यांनी लाच स्विकारलेबाबत इशारा केला नाही. त्यामुळे आम्ही सर्व सापळा पथक पंचायत समिती कार्यालयाचे बाहेर थोडया दुर अंतरावर जेथे आमचे शासकीय वाहन होते तेथे आलो. त्यावेळी आम्ही पोशि महामुलकर यांचे मदतीने तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 16:38 वा. होती. त्यानंतर तक्रारदार श्री वाडकर यांना रवाना केल्यापासून ते परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी दोन्ही पंचांसमक्ष सांगितले की, मी व पंच क्र 2 असे माझ्या दुचाकी वाहन स्प्लेंडर क्र. एम.एच.12 एस.जे. 4436 वरुन लोकसेवक श्री अमोल सुतार यांचे पंचायत समिती सासवड - पुरंदर येथील कृषी अधिकारी कार्यालयात गेलो असता तेथे लोकसेवक श्री अमोल सुतार हे कार्यालयातील त्यांचे केबीनमध्ये दिसुन आले नाही. त्यामुळे मी कार्यालयातील इतर महिला कर्मचारी यांना लोकसेवक सुतार यांचेबाबत विचारणा करता त्यांनी, ते आज येणार नाहीत असे सांगितले. त्यामुळे मी व पंच क्र.2 असे माझे दुचाकीने आपण थांबलो त्याठिकाणी परत आलो. अशी माहिती सांगीतली.

त्यानंतर तक्रारदार वारंवार लोकसेवक यांचे कार्यालयामध्ये गेल्यास, लोकसेवक हे लाच रक्कम स्वीकारणार नाहीत असे तक्रारदार श्री. वाडकर यांनी सांगितल्याने त्यादिवशीची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करुन झाले पडताळणी कारवाईचा पंचनामा लाप्रवि, पुणे कार्यालयात जावुन करण्याचे ठरविण्यात आले. तसेच तक्रारदार यांना गोपनियतेबाबत सुचना देऊन लोकसेवक तपासणी कामी येतील त्यावेळी आम्हाला कळविण्याबाबत सुचना देण्यात आली. त्यानंतर आम्ही, संपुर्ण पथक व पंच शासकीय वाहनाने सदर ठिकाणाहुन 17.20 वाजता निघुन लाप्रवि, पुणे कार्यालात 18.55 वा चे सुमारास पोहोचलो. याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिंनाक 12/01/2026 रोजी तक्रारदार यांनी आम्हाला फोन वरुन कळविले की, लोकसेवक सुतार हे घरी औजार तपासणी करीता आले नाहीत तसेच लोकसेवक सुतार हे त्यांच्या कार्यालयात असण्याची शक्यता असुन मागणी

केलेली लाच रक्कम स्विकरण्याची शक्यता आहे. त्यामुळे तक्रारदार यांचे संांगण्यावरुन दिंनाक 13/01/2026 रोजी नियोजीत सापळा कारवाई करीता आम्ही लाप्रवि कार्यालय पुणे येथुन पंच व सापळा पथकासह कारवाईचे साहीत्यासह शासकीय वाहन टाटा सुमो एम.एच.12 एन.यु.5882 यामधुन 11.36 वा.चे दरम्यान निघुन तक्रारदार यांना तसे कळवुन आम्ही सापळा पथकासह आंबोडी येथील सासवड जेजुरी बायपास पुलाचे जवळ 13:17 वा. सुमारास पोहचलो त्यावेळी तक्रारदार हे सदर ठिकाणी त्यांचे स्प्लेंडर दुचाकी गाडी क्र. एम एच 12 एस.जे.4436 सह उपस्थित होते. त्यावेळी पुढील सापळा कारवाई करण्यापुर्वी दिंनाक 05/01/2026 रोजीचे सापळा कारवाईची उजळणी करण्यात आली व त्याअनुषंगाने आजच्या सापळा कारवाई करण्याकरीता तक्रारदार व पंच सापळा पथक यांना काही सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार श्री वाडकर यांना पंच क्र.2 श्री भुजबळ यांचेसोबत लोकसेवक श्री अमोल सुतार यांना लाच रक्कम देण्याकरिता पंचायत समिती कार्यालय पुरंदर - सासवड येथे पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन आमचे व तक्रारदार श्री. वाडकर व पंच क्रमांक -1 श्री. विनोद खवले व पंच क्रमांक - 2 श्री. जयराम भुजबळ यांचे सापळा निवेदन घेण्यात आले ती वेळ 13.50 ते 13/58 वा.चे दरम्यानची होती. त्यांनतर दिंनाक 29/12/2025 रोजी तक्रारदार यांचेकडून प्राप्त केलेली लाच रक्कम पुन्हा हजर करून पंचासमक्ष तीच असलेची खात्री करून दिली. पो.शि.चंद्रकांत कदम यांनी आमचे सुचनेप्रमाणे सदर लाच रकमेच्या नोटांना अॅंथ्रॅसीन पावडर लावुन गुणधर्म सांगुन पुन्हा प्रात्यक्षिक करून दाखविले त्यानंतर आम्ही सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पथक तक्रारदार व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर 3000/- रुपये लाच रक्कम पो.शि.चंद्रकांत कदम यांचेकरवी तक्रारदार श्री वाडकर यांचे शर्टच्या डाव्या बाजुचे खिशात ठेवली. त्यांनतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांचे शर्टाचे आतील बाजूस पो.शि. 9843 महामुलकर यांचेकरवी लावला व तक्रारदार आणि पंच क्रमांक 2 श्री भुजबळ यांना तक्रारदार यांचे मोटारसायकल स्प्लेंडर दुचाकी गाडी क्र. एम एच 12 एस.जे.4436 वरून लोकसेवक श्री सुतार यांचे कार्यालय कृषी अधिकारी कार्यालय सासवड - पुरंदर येथे लाच रक्कम देण्याकरिता रवाना केले तेव्हा 14:05 वाजले होते. त्याचे मागुन मी व सापळा पथक, पंच क्रमांक 1 श्री खवले यांचे सह सरकारी वाहनाने पंचायत समिती कार्यालय सासवड- पुरंदर येथिल परीसरात आलो व कार्यालय परिसरात सापळा लावुन थांबलो. थोडया वेळाने तक्रारदार दिलीप वाडकर व पंच क्र.2 श्री भुजबळ हे कृषी अधिकारी कार्यालयाच्या बाहेर आले त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक यांनी लाच स्विकारलेबाबत इशारा केला नाही. त्यामुळे आम्ही तक्रारदार यंाचे पाठोपाठ पंचायत समिती कार्यालयाचे बाहेर आलो व शासकीय वाहनाने तक्रारदार यांचे वाहनाचे पाठोपाठ यापुर्वी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आंबोडी येथील सासवड जेजुरी बायपास पुलाचे जवळ येऊन पोहचलो. त्यानंतर माझे सुचनेवरुन पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 14:45 वा. होती.
त्यानंतर तक्रारदार श्री वाडकर यांना रवाना केल्यापासून ते परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी दोन्ही पंचांसमक्ष सांगितले की, मी व पंच क्र 2 असे माझ्या दुचाकी वाहन स्प्लेंडर क्र. एम.एच.12 एस.जे. 4436 वरुन लोकसेवक श्री अमोल सुतार यांचे पंचायत समिती सासवड - पुरंदर येथील कृषी अधिकारी कार्यालयात गेलो असता तेथे लोकसेवक श्री अमोल सुतार हे कार्यालयातील त्यांचे केबीनमध्ये दिसुन आले नाहीत. त्यामुळे मी कार्यालयातील इतर महिला कर्मचारी यांना लोकसेवक सुतार यांचेबाबत विचारणा करता त्यांनी, ते विमानतळाचे पाहणीसाठी गेले असुन आज कार्यालयात येणार नाहीत असे सांगितले. त्यामुळे मी कार्यालयाचे खाली येऊन भुजबळ मॅडम यांना माझे मो.क्र. 9763658505 यावरुन भुजबळ मॅडम यंाचे मो.क्र. 9822742175 यावर फोन केला असता त्यंाचेशी माझे फोनवर बोलणे झाले तेव्हा मी त्यांना म्हणालो की, हा आ.. कुठ.. गेला आम्ही ऑफीसला आलतो.. तेव्हा भुजबळ मॅडम मला "मी आता मघाशीच आले ऑफीसमधुन" असे म्हणाल्या त्यावर मी भुजबळ मॅडमना "तव्हाच फोन करीत होतो" असे म्हणालो त्यावर भुजबळ मॅडम "हा फोनवर , फोनवरच बोलत बोलत अलीकडं.. आले मी .. कळलच नाही तुमचा फोन येऊन गेला" असे म्हणाल्या. त्यावर मी भुजबळ मॅडमना "हा तिच तिच अ त्या सुतार साहेबांच बी फोन उचलनात ते... ते आलो होतो म्हणलं.. ते त्यांच काम करायच होत ना.." असे म्हणाले. तेव्हा भुजबळ मॅडम "ते अ.. मी सकाळपासुन ऑफीसला होते काका ते काय ऑफीसला आलेच नाही, कुठ बाहेर असतील माहित नाही" असे म्हणाल्या त्यावर मी "त्या मॅडम म्हणल्यात विमानतळावरती गेल्यात.." असे म्हणाल्या. त्यावर भुजबळ मॅडम "हा त्यांना विमानतळाच्या डयुटया असतात ना तिंकड.. जातात ते.. मीच सकाळपासन ऑफीसला होते आता आले हिंकड .. पीएमटी स्टॉपलाच उभीये बसच लागना.. असे मला म्हणाल्या. त्यावर मी भुजबळ मॅडम यांना "मग आता गेला निघुन का हाये.." असे म्हणालो. त्यावर भुजबळ मॅडम "जाऊ दे काय नाही काका पाहु नंतर आपण" असे म्हणाल्या. त्यावर मी भुजबळ मॅडम यांना

"बर.."असे म्हणालो. त्यावर भुजबळ मॅडम "तीथ ऑ ॅफीसमध्ये नका त्यांना भेटु" असे म्हणाल्या. तेव्हा मी भुजबळ मॅडम यांना "ह.." असे म्हणालो त्यावर भुजबळ मॅडम "ते नाही भेटणार तिथ ऑफीसला" असे म्हणाल्या. त्यावर मी "ह" असे म्हणालो. त्यावर भुजबळ मॅडम म्हणाल्या "आणि करतील ते बाहेर मग" तेव्हा मी भुजबळ मॅडम यांना "चालतय चालतय" म्हणालो आणि फोन ठेवला. व पंच क्र.2 असे माझे दुचाकीने आपण थांबलो त्याठिकाणी परत आलो. अशी माहिती तक्रारदार यांनी सांगीतली. त्यानंतर थोडयाच वेळात तक्रारदार यं ाचे मो.क्र. 9763658505 यावर लोकसेवक श्री सुतार यांचा मो.क्र. 84592400659 यावरुन फोन आला त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री वाडकर याना फोनचा लाऊडस्पिकर ऑन करण्याची सुचना केली तसेच पो.शि.9843 महामुलकर यांना सदरचा फोन त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यास सांगीतले. त्यावेळी पो.शि. महामुलकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री वाडकर यांच्या फोन जवळ धरला ती वेळ 14/52 वा.ची होती. त्यावेळी तक्रारदार श्री वाडकर व लोकसेवक श्री सुतार यांचेमध्ये फोनवर संभाषण झाले त्यामध्ये तक्रारदार श्री वाडकर लोकसेवक श्री सुतार यांना म्हणाले "अहो तुम्ही ते पैसे मागितले होते ते म्हणल देवुन टाकाव.." त्यावर श्री सुतार म्हणाले "अहो कोण म्हणल, नाय कोण म्हणल.. , अहो शेतकरी माणसं.. तूम्ही अस नाय म्हणनार आम्ही" तेव्हा तक्रारदार श्री वाडकर "मग तुमी नाय का म्हणला , तीन हजार रुपयात मिटवुन टाकु.. " असे म्हणाले. त्यावर लोकसेवक श्री सुतार वाडकर यांना "नाय नाय नाय तुम्हाला काय चुकीचं ऐकु असल तुम्हाला बिल घेऊन या म्हणलेल. बाकी काय म्हणल नाय अस काय म्हणु नका..तुमाला बी काय अडचण आली तर भुजबळ मॅडमला विचारत जावाना , मिटींगला हयाला असतो बाहेर मी.. ." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार श्री वाडकर "मॅडम बी फोन उचलत नाय, तुम्ही बी नाय अन इचरायच कुणाला ते आता ते" असे श्री सुतार यांना म्हणाले. तेव्हा लोकसेवक श्री सुतार हे तक्रारदार यांना "तुमी आता काय पण सांगताय, तस आहे तुमच ट्रॅक्टर पुढ पाठवलय त्यावेळेस तुम्हाला सांगितलय अन सों ंडकरच पण पाठवलय अन तस काय म्हणत जावु नका बर का.. तुमाला कोण काय म्हणल असल तर एकु नका कुणाचं.." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार श्री वाडकर लोकसेवक श्री सुतार याना "अ.. कोण काय म्हणतय तिथ कोणच.." असे म्हणाले. त्यावर श्री सुतार "नाय तस नाय म्हणत मी तुम्हाला जर कोण काय म्हणल असत तर कुणाच ऐकु नका तुमच बी बिल राहील.. त्यामुळ तुम्हाला सागितलेल.. अस कुणाच ऐकु नका अन अस फोन करु नका काय पण , तुमच पाठवलय की वरती कधीचच.." असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार श्री वाडकर लोकसेवक श्री सुतार यांना "अहो मग ते मॅसेज कसे येतात मग.." असे म्हणाले. त्यावर लोकसेवक श्री सुतार तक्रारदार श्री वाडकर यांना "अहो ते सगळ्या शेतक-यांना येतात काय झालय.. ती अ.. कुठ.. जी शेतकरी येत ना जी वेटींग मध्ये येत लॉटरीला." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार श्री वाडकर लोकसेवक श्री सुतार यांना "हा" म्हणाले. त्यावर लोकसेवक श्री सुतार हे वाडकर यांना "त्याची लॉटरी काडायची त्यासाठी त्यांनी सरसकट सगळ्या शेतक-यांना मॅसेज पाठवलाय की तुम्ही डॉक्युमेंट अपलोड करुन घ्या अन तुम्ही ओपन केल तर तुमाला तिथ दिसल की तुमच कुणाच्या डेस्कलाय.. सीओच्या डेस्कला पुढ पाठवलय आपण ते.." असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार श्री वाडकर लोकसेवक श्री सुतार यांना "होय.." म्हणाले त्यावर श्री सुतार तक्रारदार श्री वाडकर यांना "ह आ . आणि भुजबळ मॅडमला विचारत जावा मी , मिटींगला हयाला असतो त्या सागितलय ना .. माहिती तुम्हाला.." असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार श्री वाडकर लोकसेवक श्री सुतार यांना "हा.. आ.. त्या नव्हत्या ना हाफीसला.." असे म्हणाले. त्यावर लोकसेवक श्री सुतार तक्रारदार श्री वाडकर यं ाना "बर.बर.. त्यांना फोन करत जावा फोन करुन सांगितल.. माहिती दया.." असे सं ागतात त्यावर तक्रारदार " चालतय " असे म्हणुन फोन ठेवतात. वरील सर्व फोनवरील संभाषण व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला ती वेळ 14/53 वा.ची होती.

वरील सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी लोकसेविका भुजबळ यांचेसोबत फोनवर झालेल्या संभाषणादरम्यान "जाऊ दे काय नाही काका पाहु नंतर आपण, तीथ ऑ ॅफीसमध्ये नका त्यांना भेटु, ते नाही भेटणार तिथ ऑफीसला, करतील ते बाहेर मग" असे तक्रारदार यांना लोकसेवक यांनी सांगितले. त्यानंतर थोडयाच वेळात लोकसेवक श्री सुतार यांचा तक्रारदार यांना फोन आला त्यावेळी लोकसेवक श्री सुतार हे तक्रारदार यांना म्हणाले "ह आ . आणि भुजबळ मॅडमला विचारत जावा मी , मिटींगला हयाला असतो, त्यांना फोन करत जावा फोन करुन सांगतील माहिती त्या.." असे बोलले त्यामुळे तक्रारदार यांना लोकसेविका भुजबळ यं ाचेकडे पाठवुन पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच पुढील दोन तिन दिवस पुणे महानगरपालिका निवडणुक कार्यक्रम असल्याने पुढील सापळा कारवाई हि पुढील काही दिवसानी करण्याचे ठरविण्यात आले व दिनाक 13/01/2026 रोजीची सापळा कारवाई सवनुमते स्थगित करण्यात आली. त्यानंतर आम्ही, संपुर्ण पथक व पंच शासकीय वाहनाने सदर ठिकाणाहुन 15.04 वाजता निघुन लाप्रवि, पुणे कार्यालात 17.10 वा चे सुमारास

पोहोचलो. केलेल्या कारवाईबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिंनाक 18/01/2026 रोजी तक्रारदार यांनी आम्हाला फोन वरुन कळविले की, दिंनाक 13/01/2026 रोजीच्या सापळा कारवाईवेळी लोकसेवक सुतार यांनी तक्रारदार यांना पंचायत समिती कार्यालयात कार्यरत असणा-या लोकसेविका भुजबळ यांना कामासाठी फोन करत जावा असे सांगितल्याने लोकसेवक सुतार यांनी मागणी केलेली लाच रक्कम ही लोकसेविका भुजबळ यांच्यामार्फतीने स्विकारण्याची शक्यता असल्याने तक्रारदारांना यांनी दिंनाक 19/01/2026 रोजी नियोजीत सापळा कारवाई करुया असे सांगितले. त्याप्रमाणे दिंनाक 19/01/2026 रोजी 09/33 वा लाप्रवि कार्यालय पुणे येथुन आम्ही पंच व सापळा पथक कारवाईचे साहीत्यासह शासकीय वाहन मारुती सुझुकी इरटीगा एम.एच.12 यु.सी.4105 यामधुन निघुन तक्रारदार यांना तसे अवगत करून आम्ही सापळा पथकासह आंबोडी येथील सासवड जेजुरी बायपास पुलाचे जवळ 12:25 वा. सुमारास पोहचलो. त्यावेळी तक्रारदार हे सदर ठिकाणी त्यांचे स्प्लेंडर दुचाकी गाडी क्र. एम एच 12 एस.जे.4436 सह उपस्थित होते होते. त्यावेळी तक्रारदार, पंच यांना आतापर्यत झालेल्या सापळा कारवाईबाबत उजळणी केली. त्यानंतर पुढील सापळा कारवाईचे अनुषंगाने आमचे व तक्रारदार श्री वाडकर व पंच क्र.1 श्री विनोद खवले व पंच क्र.2 श्री जयराम भुजबळ यांचे सापळा कारवाई निवेदन व्हाइस रेकॉर्डरच्या सहाय्याने 11/58 वा सुरु करुन ते 12/05 वा.पर्यत घेण्यात आले. त्यानंतर दिंनाक 13/01/2026 रोजीचे सापळा स्थगीत पंचनामा कारवाइवेळी सिंलबद करण्यात आलेली लाच रक्कम 3000/- रुपये तक्रारदार श्री वाडकर व पंचांसमक्ष हजर केली. त्यानंतर सापळा पथकास व पंच साक्षीदार व तक्रारदार श्री वाडकर यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य सुचना दिल्या व तक्रारदार श्री दिलीप वाडकर यांना पंच क्र.1 श्री खवले यांचेसह लोकसेविका भुजबळ कृषी अधिकारी पंचायत समिती पुरंदर - सासवड यांचेकडे लोकसेवक श्री सुतार यांनी पडताळणी कारवाईवेळी मागणी केल्याप्रमाणे लाच रक्कम 3000/- रुपये हे लोकसेविका भुजबळ हया लोकसेवक श्री सुतार यांचेतर्फे स्विकारतात का याची पडताळणी करण्याकरीता लोकसेविका यांचे कार्यालय पंचायत समिती सासवड पुरंदर येथील कृषी अधिकारी कार्यालय येथे पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री वाडकर यांना पो.शि.महामुलकर यांचेकरवी शासकीय व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच नं. 1 श्री खवले यांचेसोबत तक्रारदार यांचे दुचाकी हिरो होंडा स्प्लेंडर गाडी क्र. एम एच 12 एस.जे. 4436 वरुन रवाना केले ती वेळ 12:08 वा.ची होती. त्याचेपाठोपाठ आम्ही व सापळा पथक व पंच क्र.2 श्री जयराम भुजबळ असे शासकीय वाहनाने रवाना झालो व कार्यालय परीसरामध्ये थांबलो. थोडया वेळाने तक्रारदार हे लोकसेवक यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा न करता पंच क्र.1 श्री खवले यांचेसोबत जिन्यामधुन बाहेरच्या दिशेने निघुन आले व पंच क्र.1 यांचेसोबत त्यांचे दुचाकी गाडीवरुन पुन्हा माघारी निघाले. त्याचे पाठोपाठ आम्ही व उर्वरीत सापळा पथक शासकीय वाहनाने आंबोडी येथील पुलाखाली आलो. त्यावेळी पो.शि.महामुलकर यांचेकरवी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 14/44 वा.ची होती.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री दिलीप वाडकर यांना घडलेली हकिकत विचारली तेव्हा त्यांनी सांगितले की, "मी व पंच क्र 1 श्री खवले असे माझ्या दुचाकी वाहन स्प्लेंडर क्र. एम.एच.12 एस.जे. 4436 वरुन लोकसेविका श्रीमती भुजबळ मॅडम यांचे पंचायत समिती सासवड - पुरंदर येथील कृषी अधिकारी कार्यालयात गेलो असता तेथे भुजबळ मॅडम हया कार्यालयातील त्यांचे केबीनमध्ये दिसुन आले नाही. त्यामुळे मी कार्यालयातील इतर महिला कर्मचारी यांना भुजबळ मॅडम यांचेबाबत विचारणा करता त्यांनी, त्या आत्ताच बाहेर गेल्या असे संािगतले े त्यानंतर मी भुजबळ मॅडम यांना फोन केला त्यावेळी त्यांचा फोन व्यस्त लागत होता. त्यामुळे मी व पंच क्र.1 श्री खवले असे माझे दुचाकीने आपण थांबलो त्याठिकाणी परत आलो" अशी माहिती तक्रारदार यांनी सांगितली.

त्यानंतर लोकसेविका श्रीमती भुजबळ हया कार्यालयात आल्या असण्याची शक्यता असल्याने पुन्हा एकदा तक्रारदार यांना पंच क्र.1 श्री खवले यांचेसोबत पंचायत समिती कार्यालय येथे पडताळणी व सापळापुर्व व सापळा कारवाईकामी व्हाइस रेकॉर्डर लावुन पाठविण्यात आले ती वेळ 16/14 ची होती. त्यांचे पाठोपाठ आम्ही व सापळा पथक सुध्दा कोणासा संशय येणार नाही अशा रितीने कार्यालयाचे बाहेरचे परिसरात पोहोचुन विखरुन थांबलो. त्यावेळी लोकसेविका कार्यालयामध्ये हजर नसल्यामुळे व कार्यालय बंद होण्याची वेळ झाल्यामुळे लोकसेविका हया कार्यालयात येण्याची शकयता वाटत नसल्याने तक्रादार व पंच हे पुन्हा आंबोडी येथील पुलाखाली परत आले ती वेळ 17/03 वा.ची होती.

त्यानंतर काही वेळानंतर लोकसेविका श्रीमती भुजबळ यांचा तक्रारदार यंाना फोन आला त्यावेळी लोकसेविका

श्रीमती भुजबळ व तक्रारदार वाडकर यंाची फोनवर चर्चा होऊन "ऐका ना.. काका तित ऑफीसला नका काय हे करु.. मी येणारे तुमच्या घरी आले की तुमाला सांगते तुमाला.. अ.. बुधवारी येणारे.. चक्कर होईल माझी. बुधवारी घरी चक्कर मारती.. तित ऑफीसला नकाच येऊ..फोन जाऊ..." असे लोकसेविका भुजबळ यांनी तक्रारदार यांना फोनवर सांगितले. त्यामुळे बुधवारी लोकसेविका तक्रारदार यांच्या घरी येणार असल्याने त्या ठिकाणी पुढील पडताळणी व सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले त्यामुळे दि.19/01/2026 रोजीची सापळा कारवाई सर्वानुमते स्थगित करण्यात आली.

दिंनाक 19/01/2026 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेविका श्रीमती भुजबळ हया तक्रारदार यांच्या घरी औजार तपासणी कामी दिंनाक 21/01/2026 रोजी येणार असल्याबाबत तक्रारदार यांना फोनवरील संभाषणात निष्पन्न झाल्याने तक्रारदार यांनी दिंनाक 21/01/2026 रोजी नियोजीत सापळा कारवाई करुया असे सांगितले. त्याप्रमाणे दिंनाक 21/01/2026 रोजीचे सापळा कारवाई तक्रारदार यांच्या घरी करण्याकरीता सापळा पथक व पंचासह शासकीय वाहनासह रवाना झालो. तेथे पोचल्यावर आम्ही आतापर्यत झालेल्या कारवाईची उजळणी केली. त्यावेळी शासकीय व्हाईस रेकॉर्डरमध्ये सापळा कारवाईचे निवेदन घेतले. त्यानंतर तक्रारदार श्री वाडकर यांनी 12/21 वाजता त्यांचे मो.क्र.9763658505 वरुन लोकसेविका भुजबळ यंाचे मो.क्र. 9822742175 यावर फोन केला तो कॉल शासकीय व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला. त्यावेळी श्रीमती भुजबळ या ऑनलाईन मिटींगवर व्यस्त असल्याने त्यांचे पती (नाव माहित नाही) यांनी फोन उचलला त्यावर तक्रारदार यांचे बोलणे झाले त्यादरम्यान भुजबळ यांचे पतीने 5-10 मिंनटात त्यांच होईल मग मॅडमना कॉल करायला सांगतो" असे सांगुन फोन ठेवला त्यानंतर 13/16 वाजता लोकसेविका श्रीमती भुजबळ यांचा तक्रारदार यांना फोन आला, त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल फोन स्पिकरवर ठेवला व व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला. तेव्हा लोकसेविका भुजबळ तक्रारदार यांना म्हणाल्या की सायकल रेसची डयुटी लागली असल्याने माझ्या मिंस्टराना पाठवुन का असे विचारले त्यावेळी तक्रारदार यांचे राहते घरी मोबाईल नेटवर्क नसल्याने फोन कट झाला. त्यानंतर 13/44 वाजता लोकसेवक श्रीमती भुजबळ यांचा तक्रारदार यांना फोन आला त्यावेळी तक्रादार यांनी त्यांचा फोन स्पिकरवर ठेवला व तो व्हाईस रेकॉर्डरम मध्ये रेकॉर्ड केला. त्यावेळी भुजबळ यांनी तक्रारदार यांना त्यांचे पतीला तक्रारदार यांचे घरी पाठविले असल्याचे सांगितले. परंतु त्यावेळी तक्रारदार हे घरापासुन थोडया दुर अंतरावर सापळा पथकासोबत असल्यामुळे त्यांची भेट झाली नाही. त्यावेळी तक्रारदार श्री वाडकर यांनी भुजबळ यांना लोकसेवक श्री सुतार यंाचेसोबत माझे बोलणे झाले होते. त्यांनी 3000/- रुपये देण्याबाबत सांगितले होते. ते तुमच्याशी काही बोलले का पैस्याबाबत असे विचारले. त्यावेळी भुजबळ तक्रारदार यंाना "मला काय आयडीया नाय बर का त्याची" असे म्हणाल्या व "आता राहुदया मी जात"ं म्हणुन फोन कट केला. ती वेळ 13/46 वा.ची होती. श्रीमती भुजबळ यांना सायकल रॅलीची डयुटी असल्यामुळे त्या बंदोबस्ताकरीता भिवरी येथे असल्यामुळे सदर दिवशीची सापळा कारवाई सर्वानुमते स्थगित करण्यात आली. व त्याच दिवशी ला.प्र.वि.कार्यालय येथे सापळा पथक व पंचासोबत येऊन कारवाईबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.

दिंनाक 21/01/2026 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेविका भुजबळ यांना लोकसेवक सुतार यांनी केलेल्या 3000/- रुपये लाच मागणीबाबत काहीही माहिती नसल्याचे निष्पन्न झाल्याने तसेच तक्रारदार यांना दिंनाक 25/02/2026 पर्यत ट्रॅक्टर अनुदान प्राप्त न झाल्याने दिंनाक 25/02/2026 रोजी तक्रारदार यांनी लोकसेवक सुतार हे स्वत: लाच रक्कम स्विकारतील असे सांगितल्याने तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे दिंनाक 26/02/2026 रोजी नियोजीत सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे दिंनाक 26/02/2026 रोजी सापळा कारवाई करण्याकरीता आम्ही सापळा पथक व पंच यांचेसह सासवड जेजुरी बायपास येथील आंबोडी ब्राीज येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार श्री दिलीप वाडकर हे तेथे हजर होते. त्यावेळी सापळा कारवाईची उजळणी करुन पुढील सापळा कारवाई करण्याकरीता शासकीय व्हाईस रेकॉर्डरसह 13/41 वाजता पंच क्र.1 श्री खवले यांचेसह लोकसेवक श्री सुतार व लोकसेविका भुजबळ कृषी अधिकारी पंचायत समिती पुरंदर - सासवड यांचेकडे श्री सुतार यांनी पडताळणी कारवाईवेळी मागणी केल्याप्रमाणे लाच रक्कम 3000/- रुपये देऊन लोकसेवक श्री सुतार व लोकसेविका श्रीमती भुजबळ यांचे कार्यालय पंचायत समिती सासवड पुरंदर येथील कृषी अधिकारी कार्यालय येथे पाठविण्यात आले. त्यावेळी लोकसेविका श्रीमती भुजबळ हया कार्यालयात हजर नव्हत्या परंतु लोकसेवक श्री सुतार हे कार्यालयात हजर होते त्यावेळी लोकसेवक श्री सुतार व तक्रारदार श्री वाडकर यांचेमध्ये बोलणे झाले. तेव्हा तक्रारदार श्री वाडकर यांचेकडे लोकसेवक श्री सुतार कोणत्याही प्रकारे लाचेची मागणी अथवा स्विकार केला नाही. तसेच तक्रारदार यांचे औजाराच काम हे त्याचवेळी पुढ पाठविले असल्याचे तक्रारदार यांना

सांगितले. तसेच "मी मागच्या वेळी शेतकरी मासिकचे चारशे घ्या असे बोललो होते" असे तक्रारदार यंाना म्हणाले असुन तक्रारदार यांचे काम पुढ पाठविलय असे सांगितले. तसेच तुमचा कायतरी गैरसमज झालाय असे तक्रारदार यांना म्हणाले. तसेच "मी चारशे रुपये मासिकाबाबत बोलत होतो ते पण कंम्पल्सरी नाही" असे सांगितले. तसेच त्याचवेळी पुढ पाठविलय तुमच "ते ते भुजबळ मॅडमच्या लॉगिनला होतं, त्या पुढं पाठवणारं तालुक्याच्या लॉगिनला, जर तालुक्याच्या लॉगिनला, "हअं तुमचं ते पाठवलय पुढं, फोंडकरचं पण पाठवलयं मॅडमनं पुढं असे म्हणाले व लाच रक्कमेबाबत मागणी केली नाही. तसेच तक्रारदार श्री वाडकर यांना लोकसेवक श्री अमोल सुतार यांनी दिंनाक 29/12/2025 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान मागणी केलेली 3000/- रुपये लाच रक्कम देण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी मी मासिकाचे रक्कम चारशे रुपये देण्याबाबत बोललो होतो असे सांगितले. परंतु दिंनाक 29/12/2025 रोजीचे पडताळणी कारवाईवेळी मासिकाच्या रक्कमेबाबत लोकसेवक व तक्रारदार यांच्यामध्ये बोलणी झालेली नाही. लोकसेवक श्री अमोल सुतार कृषी अधिकारी यानंी तक्रारदार श्री दिलीप वाडकर यांचे ट्रॅक्टर अनुदान मंजुरी प्रस्ताव पुढे पाठविण्याकरीता दिनाक 29/12/2025 रोजीचे पडताळणी कारवाईवेळी वेळी तक्रारदार श्री वाडकर यंाच्याकडे रुपये 3000/- लाचेची मागणी केली. परंतु दिंनाक 29/12/2025, दि. 05/01/2026, दि.13/01/2026, दि.19/01/2026, दि.21/01/2026 व 26/02/2026 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री सुतार यांना संशय आल्याने त्यांनी स्विकारली नाही.

तरी लोकसेवक श्री अमोल सुनिल सुतार, वय 31 वर्षे, मंडळ कृषी अधिकारी ( सासवड), वर्ग-2, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पुरंदर जिल्हा पुणे यांनी तक्रारदार श्री दिलीप गंगाराम वाडकर रा. मु. वारवडी, पो. गराडे, ता. पुरंदर जिल्हा पुणे यांचेकडे त्यांचे ट्रॅक्टर अनुदान मंजुरी प्रस्ताव पुढे पाठविण्याकरीता दिंनाक 29/12/2025 रोजीचे पडताळणी पंचनामा कारवाई दरम्यान पंचायत समिती कार्यालय, सासवड - पुरंदर जिल्हा पुणे येथे तक्रारदार श्री दिलीप वाडकर यांना पंचासमक्ष 3000/रू लाच रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणुन श्री अमोल सुतार, पद- कृषी अधिकारी, नेमणुक पंचायत समिती कार्यालय सासवड पुरंदर, यांनी सरकारी पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांचेकडे 3000/- रुपयांची लाच मागणी केली आहे. म्हणून माझी लोकसेवक श्री अमोल सुनिल सुतार , मंडळ कृषी अधिकारी ( सासवड), वर्ग-2, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पुरंदर जिल्हा पुणे यांचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

KUMAR RAMCHANDRA KADAM(I (Inspector)) / 14601000450KRKM7801F **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
शिवाजीनगर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** KUMAR RAMCHANDI
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 14601000450KRKM780